प्रेस नोट

दिनांक - १६/१०/२०२६

दोन दिवसीय अंमली पदार्थविरोधी विशेष मोहिमेत ७२ गुन्हे दाखल, २१ फरार व पाहिजे आरोपींना अटक, अजामीनपात्र वॉरंट बजावून ४० आरोपींना अटक, रु. १५.८७ कोटींचा मुद्देमाल जप्त

मुंबईत ३० जुलै २०२६ पासून सुरु करण्यात आलेल्या "ड्रग फ्री मुंबई" अभियाना अंतर्गत, तसेच केंद्र शासनाच्या २ ऑगस्ट २०२६ रोजी सुरु झालेल्या "नशामुक्त भारत अभियान" यांच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने, मुंबई पोलिसांनी **१४ व १५ ऑक्टोबर २०२६** रोजी संपूर्ण मुंबई शहरात अंमली पदार्थविरोधी विशेष मोहीम राबविण्यात आली. कायद्याची कठोर अंमलबजावणी, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती या त्रिसूत्रीवर आधारित अभियानाचा भाग असलेल्या या विशेष मोहिमेत एनडीपीएस कायद्याअंतर्गत अंमली पदार्थ बाळगणे/विक्रि करण्याऱ्याविरुध्द् गुन्हे दाखल करणे, पूर्व दाखल गुन्ह्यांतील फरार व पाहिजे आरोपींना अटक करणे आणि आरोपीतां विरुध्द प्राप्त अजामीनपात्र वॉरंटची बजावणी करणे, या तीन प्रमुख बाबींवर विशेष लक्ष्य केंद्रीत करण्यात आले.

पोलीस ठाणे, अंमली पदार्थविरोधी विशेष कक्ष आणि गुन्हे शाखेच्या इतर कक्ष कार्यालयांनी समन्वयाने केलेल्या कारवाईत **७२ गुन्हे** दाखल करण्यात आलेले आहेत. त्याव्यतिरिक्त **२१ फरार** व **पाहिजे आरोपींना** देखिल अटक करण्यात आलेली आहे. तसेच न्यायालयाकडून प्राप्त अजामीनपात्र वॉरंटची बजावणी करुन एकूण ४० आरोपींना या मोहिमेदरम्यान अटक करण्यात आलेली आहे. सदरच्या विशेष मोहिमेदरम्यान **गांजा, मेफेड्रोन (एमडी), हेरॉईन / ब्राऊन शुगर, चरस, एलएसडी पेपर, कोकेन, हशिश** आणि हायड्रोपोनिक गांजा असे **एकूण ४६.१६ किलो अंमली पदार्थ** व **कोडीनमिश्रित कफ सिरपच्या एकूण ९,५४० बाटल्या** असा एकूण अंदाजे **रु.१५.८७ कोटी किमतीचा मुद्देमाल** व **रु. ९.४७ लाख रोख रक्कम** जप्त करण्यात आलेली आहे.

विशेष मोहिमेदरम्यान पूर्व अंमली पदार्थ विरोधी दाखल गुन्ह्यांतील आरोपी हा त्यांच्या इतर ०४ साथीदारांसह संघटित टोळी बनवून अंमली पदार्थाचा व्यवसाय करीत असल्याचे निष्पण्ण झाल्याने नमूद ०५ आरोपीतांविरुध्द् गुन्हे शाखेकडून सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (MCOCA) कारवाई केली. तसेच प्रतिबंधात्मक कारवाईचा भाग म्हणून एनडीपीएस गुन्ह्यांतील एका सराईत आरोपीस PIT-NDPS कायद्यांतर्गत एक वर्षासाठी नाशिक कारागृहात स्थानबध्द् करण्यात आले. सन २०२६ मध्ये आतापर्यंत एकूण १४ जणांविरुद्ध PIT-NDPS कायद्यांतर्गत कारवाई करुन स्थानबध्द् करण्यात आलेले आहे.

विशेष मोहिमेदरम्यान 'एनडीपीएस गुन्ह्यांतील आरोपींची **२० अनधिकृत घरे** व **१४५ अवैध पानटपऱ्या** निष्कासित करण्यात आल्या. अंमलबजावणी व प्रतिबंधात्मक कारवाईसोबतच अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृतीवरही भर देण्यात येत आहे. शाळा, महाविद्यालये, गणेशोत्सव- नवरात्रौत्सव आणि सार्वजनिक ठिकाणी आयोजित गरबा कार्यक्रमांसह **९,०३१** ठिकाणी राबविण्यात आलेल्या जनजागृती उपक्रमांत १,८३,९२८ नागरिक सहभागी झाले आहेत.

अंमली पदार्थ विरोधात सातत्यपूर्ण कारवाई, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि लोक सहभागाच्या माध्यमातून **"ड्रग फ्री मुंबई"** चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुंबई पोलीस कटिबद्ध असून अंमली पदार्थांशी संबंधित कोणतीही माहिती राष्ट्रीय अंमली पदार्थ हेल्पलाईन (MANAS) - **1933** द्वारे पोलिसांना देऊन या अभियानात सहकार्य/सहभागी होण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे.

.....

Scanned with CamScanner